## म.सं.कौ.हिं.का.अर्ज - ९/२०१९ मध्ये निशाणी क्रं- १७ वरील आदेश
## (ममता वि. दुर्गेश व इतर )

१. अर्जदाराने मुळ अर्जामध्ये दुरुस्ती करण्याची परवानगी प्रस्तुत अर्जान्वये केली आहे.

२. अर्जदार असे कथन करते की, तिने सदरचा अर्ज हा दिनांक २४.०४.२०१९ रोजी विद्यमान न्यायालयात दाखल केला होता. त्यावेळी अर्जदार ही गैरअर्जदार क्र. १ याचेपासून गर्भवती होती परंतु गर्भ हा एक महीन्याचा असल्यामुळे अर्जदाराला ती स्वतः गर्भवती असल्याची कल्पना नव्हती. परंतु सदरचा मामला दाखल झाल्यानंतर काही दिवसाने अर्जदारास ती गर्भवती असल्याबाबत कळले. दिनांक ०२.०१.२०२० रोजी मुलगी नामे ज्ञानेश्वरी जन्माला आली. त्यामुळे सदर मामल्यात अर्जदारास त्या अनुषंगाने दुरुस्ती करणे अतिशय आवश्यक आहे.

३. अर्जदारास विशेष निवेदनाच्या पॅरामध्ये खालीलप्रमाणे दुरुस्ती करावयाची आहे. पॅरा क्र. ६ च्या शेवटी ''त्यावेळी अर्जदार ही गैरअर्जदार क्र. १ कडून गर्भवती होती व तिला दिनांक ०२.०१.२०२० रोजी मुलगी नामे ज्ञानेश्वरी जन्माला आली.'' त्याचप्रमाणे पॅरा क्र. ७ च्या शेवटी ''मुलगी नामे ज्ञानेश्वरी जन्माला आल्यानंतर गैरअर्जदार यांनी जन्माला आलेल्या बाळाची सुध्दा कधीही विचारपुस केली नाही किंवा तिला पाहायला सुध्दा आले नाही'' तसेच तक्रारकर्तीच्या मागण्यामधील पॅरा क्र. ब मध्ये १५०००/- रु. नंतर ''व लहान मुलगी नामे ज्ञानेश्वरी हीला तिच्या पालनपोषणाकरीता ५०००/- रु'' अशा प्रकारचा मजकुर समाविष्ठ करावयाचा आहे. अर्जदाराने पुढे कथन केले की, सदरच्या दुरुस्तीमुळे मामल्याच्या स्वरुपात कोणताही बदल घडून येत नाही. तिला बाळ झाल्यानंतर दरम्यानच्या कालावधीत बाळाची प्रकृती

अस्वस्थ असल्यामुळे त्याचप्रमाणे कोरोना विषाणुचा प्रादुर्भाव असल्यामुळे अर्जदाराला सदरच्या मामल्यात लगेच दुरुस्ती करता आली नाही. सदरच्या मामल्यात वरीलप्रमाणे दुरुस्तीची परवानगी न दिल्यास अर्जदार हिचे फार मोठया प्रमाणात पैशाच्या स्वरुपात भरुन न निघणारे नुकसान होईल त्यामुळे अर्जदाराने दुरुस्ती करण्याची परवानगी मिळण्याची विनंती केली आहे.

४. सदर अर्जावर गैरअर्जदारांनी आपले म्हणणे सादर करुन प्रस्तुतच्या अर्जास विरोध दर्शविले. गैरअर्जदारांच्या म्हणण्यानुसार अर्जदाराचा सदरील अर्ज कायदयाच्या कोणत्या प्रावधानाखाली दाखल केला हे नमुद केलेले नाही. सदरील अर्जामध्ये नमुद असलेले कारण देखील संयुक्तिक नाही. गैअरर्जदाराने पुढे असे कथन केले की, अर्जदाराने तिचे उपरोक्त अर्जामध्ये मुलगी नामे ज्ञानेश्वरी दिनांक ०२.०१.२०२० ला जन्माला आली असे नमुद केले आहे तर तेव्हापासून आजपर्यंत सदरील दुरुस्ती का केलेली नाही हे ही नमुद नाही. तसेच मुलगी कोणाची आहे हे पुराव्यात सिध्द करण्याची जबाबदारी अर्जदाराची आहे त्यामुळे गैरअर्जदारांनी अर्ज खारीज करण्याची विनंती केली.

५. अर्ज व त्यावरील म्हणणे वाचले. अर्जदार व गैरअर्जदार यांच्या विधिज्ञांचा युक्तिवाद ऐकला. अभिलेखावर दाखल कागदपत्रांचे अवलोकन केले. प्रस्तुत अर्जान्वये अर्जदारास करावयाच्या दुरुस्तीचा विचार केला असता असे दिसून येते की, प्रस्तुतचा अर्ज दाखल झाल्यानंतर दिनांक ०२.०१.२०२० रोजी तिला मुलगी नामे ज्ञानेश्वरी झाली असे तिने नमुद केले आहे. गैरअर्जदारांना अर्जदार व गैरअर्जदार क्र. १ यांच्या लग्नाबाबत वाद नाही. गैरअर्जदारांनी घेतलेल्या आक्षेपाचा विचार अंतिम युक्तिवादाच्या वेळी विचारात घेण्यात येईल. अर्जदाराने बाळ झाल्यानंतर दरम्यानच्या कालावधीत बाळाची प्रकृती अस्वस्थ असल्यामुळे त्याचप्रमाणे कोरोना विषाणुचा प्रादुर्भाव असल्यामुळे अर्जदाराला लगेच दुरुस्ती करता आली नाही असे नमुद केले आहे.

आजरोजी अर्जदार आपले मुलीसोबत माहेरी राहत आहे ही बाब देखील वादातीत आहे. निश्चितच अर्जदाराचा अर्ज नामंजुर केल्यास तिचे पैशाचे स्वरुपात भरुन न निघणारे नुकसान होईल. प्रस्तुतचा मामल्यामध्ये दोन्हीही बाजुंचा पुरावा येणे बाकी आहे. प्रस्तुत प्रकरण हे अर्जदाराच्या पुराव्याकरीता मुकरर असून अद्यापपावेतो अर्जदाराने अभिलेखावर पुरावा दाखल केलेला नाही. अर्जदाराच्या उदरनिर्वाहाकरीता गैरअर्जदारांनी काही एक केल्याचे प्रथमदर्शनी दिसून येत नाही. यावरुन अर्जदारास तिला व तिच्या मुलीच्या पालनपोषणाची जबाबदारी पेलावी लागत असल्याचे प्रथमदर्शनी दिसून येत आहे. सदर दुरुस्तीने मुळ अर्जामध्ये कोणताही बदल होत नाही. या सर्व बाबींचा विचार करता मी खालील आदेश पारीत करीत आहे.

## आ दे श

१. अर्जदाराचा नि. क्र. १७ वरील अर्ज मंजूर करण्यात येतो.

२. अर्जदाराने आपले मुळ अर्जामध्ये दुरुस्ती करुन दुरुस्ती प्रत अभिलेखावर दाखल करावी.

PRATIK SOPANRAO SONKAMBLE

Digitally signed by PRATIK SOPANRAO SONKAMBLE
Date: 2022.02.02 17:07:22 +0530

(प्रतिक सो. सोनकांबळे)
प्रथम वर्ग न्यायदंडाधिकारी
अर्जुनी/मोरगाव

दि. ०२/०२/२०२२.

***CERTIFICATE***

This is to certify that, the contents of this uploaded judgment/order are same and correct as per the original judgment/ order, signed by the Presiding Officer.

| | |
|---|---|
| Date of judgment/order | : 02/02/2022 |
| Date of uploading the judgment/order | : 02/02/2022 |
| Uploaded by Stenographer – | Sau. Pratibha D. Bawankar,<br>Steno(L.G.) |